
# संतोष देशमुख हत्या प्रकरणातील प्रमुख साक्षीदाराला साक्ष मागे घेण्यासाठी सख्ख्या भावाने दिली जीवे मारण्याची धमकी!!


स्क्रीन रिडरचा बादशहा

सांज दैनिक बीड RNI : Regd.No.MAH/MAR/2010/43846

# वास्तव



भारतरत्न रतनजी टाटा यांच्या महान देशभक्तीला समर्पित

२१ वर्षे

एडिटर इन चिफ- जितेंद्र सिरसाट

सच करीब से ही दिखता है...!

● बीड ● शनिवार, दिनांक ३० मे २०२६ ● वर्ष २१ वे ● पाने : ४ http ://epaper.beedvastav.com Email : beedvatsav@gmail.com ● किंमत ३ रुपये


# डोक्यावर भगवा रुमाल, खाली बाज टाकली,

# रखरखत्या उन्हात मनोज जरांगेचं उपोषण सुरू

चर्चा झालेली आहे पुन्हा एकदा सांगतो न्यायालय, कायदा आणि संविधान याच्या चौकटीत बसून कोणताही निर्णय घेण्यास तयार : देवेंद्र फडणवीस

सातारा संस्थानचा जीआर काढा, गॅझेटरनुसार अर्ज करणाऱ्याला प्रमाणपत्र द्या, व्हॅलिडीटी द्या, नाही दिली तर अधिकाऱ्यांवर कारवाई करा : जरांगे पाटील

सरकार मराठा आरक्षणाबाबत सकारात्मक असून आमची भूमीका पारदर्शक! आम्ही समाजांना एकमेकांनासमोर आणून भांडत नाही : देवेंद्र फडणवीस

## सराठा समाजाच्या हिताचे निर्णय घेणार, पण कोर्टाच्या आदेशांचेही पालन करावे लागणार!!



**जालना : प्रतिनिधी**

**मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी आजपासून अंतरवालीत आमरण उपोषण सुरु केलं आहे. 'सातारा संस्थानचा जीआर काढा, गॅझेटरनुसार अर्ज करणाऱ्याला प्रमाणपत्र द्या, व्हॅलिडीटी द्या, नाही दिली तर अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी', असा आदेश काढावा, अशी मागणी मनोज जरांगेंनी केली. दरम्यान, मनोज जरांगेंच्या उपोषणस्थळी मंत्री राधाकृष्ण विखे पाटील त्यांच्या भेटीला गेले आहेत. या बैठकीत सरकारने जरांगे पोटलांना नवीन आश्वासने दिली आहेत.**

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची पहिली प्रतिक्रिया

● 'सरकार मराठा आरक्षणाबाबत सकारात्मक आहे. सरकारची भूमीका पारदर्शक आहे. आम्ही सकारात्मक काम करणारे लोक आहे. आम्ही समाजांना एकमेकांनासमोर आणून भांडत नाही', असं देवेंद्र फडणवीसांनी सांगितलं. तसेच 'आम्ही समाजाच्या हिताचे निर्णय घेतो. परंतु त्याचवेळी संविधान आणि न्यायालयाच्या निर्णयाच्या आधिन राहून निर्णय घेतो', असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

### फडणवीस सरकारची नवीन पाच आश्वासने

- महिन्याभरात मराठा आरक्षण कक्ष सुरु करु
- नोंदी, प्रमाणपत्र वाटप, जातपडताळीसाठी 8 दिवसांत खाल हेल्पलाईन सुरु करु
- कुणबी प्रमाणपत्र वितरणासाठी एसओपी तयार करु
- आंदोलकांच्या वारसांना 15 दिवसांत अर्थसहाय्य करु
- हयगय केलेल्या अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करु

### ओबीसी समाजावर कोणताही अन्याय होऊदेणार नाही!




**फडणवीस काय म्हणाले ?**

'एका समाजाचा काढून दुसऱ्या समाजाला द्यायचा असं कधीही केलं नाही, ओबीसी समाजालाही घाबरण्याची आवश्यकता नाही, मराठा समाजाचाही त्या ठिकाणी समाधान करून देण्याकरिता सगळे निर्णय घेऊ परंतु ओबीसी समाजावर कोणताही अन्याय होऊ देणार नाही. आता चर्चा झालेली आहे पुन्हा एकदा सांगतो न्यायालय, कायदा आणि संविधान याच्या चौकटीत बसून कोणताही निर्णय घेण्यास तयार आहोत', असं देवेंद्र फडणवीसांनी स्पष्ट केलं.

### मनोज जरांगे उपोषण मागे घेणार का? याकडे महाराष्ट्राचं लक्ष लागलं




दरम्यान, काल झालेल्या दीड तासांच्या बैठकीत मनोज जरांगे यांनी हैदराबाद गॅझेट आणि सगेसोयऱ्यांच्या कुणबी दाखल्यांच्या मुद्द्यावरून विखे पाटलांवर प्रश्नांची सरबत्ती केली होती. 'आम्ही सरकारला खूप वेळ दिला, आता आणखी वेळ देणार नाही,' असं म्हणत जरांगे यांनी मसुदा लेखी स्वरूपात पाहिल्याशिवाय आंदोलन मागे घेणार नसल्याचा पवित्रा घेतला होता. आता सरकारचा हा अधिकृत ड्राफ्ट समोर आल्यानंतर मनोज जरांगे पाटील हे आपले उपोषण मागे घेणार का? याकडे संपूर्ण महाराष्ट्राचं लक्ष लागलं आहे.

## सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील

# मुख्य साक्षीदार दादा खिंडकर यांची तक्रार

**बीड : प्रतिनिधी**

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणाने आता आणखी एक धक्कादायक वळण घेतले आहे. या खटल्यातील एक प्रमुख साक्षीदार असलेल्या दादा खिंडकर यांना साक्ष मागे घेण्यासाठी चक्क त्यांच्या सख्ख्या भावानेच जीवे मारण्याची धमकी दिल्याची बाब समोर आली आहे. या प्रकरणी बीडच्या शिवाजीनगर पोलिस ठाण्यात अदखलपात्र गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. या घटनेमुळे बीडमध्ये एकच खळबळ माजली आहे.

### दादा खिंडकर हे मृत सरपंच संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांचे साडू

दादा खिंडकर हे मृत सरपंच संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांचे साडू आहेत. तसेच या प्रकरणातील एक प्रमुख साक्षीदारही आहेत. आता त्यांना त्यांचा छोटा भाऊ समाधान खिंडकर यांनी साक्ष न देण्यासाठी जीवे मारण्याची धमकी दिल्याची बाब समोर आली आहे. यासंबंधीच्या माहितीनुसार, समाधान खिंडकर हे नुकतेच दादा खिंडकर यांच्या घरी आले होते. त्यांनी तिथे जुन्या वादाची खपली काढत दादा खिंडकला सांगितले की, तू धनंजय देशमुख यांच्यासोबत राहू नकोस. संतोष देशमुख प्रकरणात साक्षही देऊ नकोस. उलट त्यांना हे प्रकरण मिटवून घ्यायला सांग.





### दादा खिंडकर यांची पोलिसांत तक्रार

समाधान खिंडकर यांच्या या सूचनेमुळे दादा खिंडकर यांनी त्यांना या प्रकरणापासून दूर राहण्याचा व आपले काम करण्याचा सल्ला दिला. पण समाधान यांनी दादा खिंडकर यांना शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिली. या घटनाक्रमानंतर दादा खिंडकर यांनी तात्काळ शिवाजी नगर पोलिस ठाणे गाठून झाल्या प्रकाराची तक्रार दाखल केली. पोलिसांनीही यासंबंधी वेळ न दवडता तात्काळ अदखलपात्र गुन्ह्याची नोंद केली.

### देशमुख हत्या प्रकरणाती साक्ष बदलण्यासाठी लहान भावानेच दिली धमकी

विशेष म्हणजे प्रस्तुत प्रकरणातील तक्रारदार दादा खिंडकर व आरोपी समाधान खिंडकर या दोन्ही भावांत गत अनेक दिवसांपासून कौटुंबिक व इतर कारणांवरून वाद सुरू आहे. यापूर्वी दादा खिंडकर यांच्यावरही काही तरुणांना मारहाण केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. पण आता संतोष देशमुख हत्या प्रकरणाती साक्ष बदलण्यासाठी त्यांच्या लहान भावानेच त्यांना धमकी दिल्यामुळे आता या प्रकरणाला वेगळे वळण मिळण्याची शक्यता आहे.

## शिवनेरी भूषण पुरस्कृत हभप ज्ञानेश्वर महाराज वाबळे यांचा महाविद्यालयात सत्कार

**आष्टी / प्रतिनिधी :**

येथील आनंद चॅरिटेबल संस्था संचलित आनंदराव धोंडे उर्फ बाबाजी महाविद्यालय, कडा येथे प्रा. डॉ. शाम सांगळे यांच्या शिक्षण क्षेत्रातील प्रदीर्घ सेवेच्या सेवापूर्ती व गौरव ग्रंथ प्रकाशन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला शिवनेरी भूषण राष्ट्रीय कीर्तनकार पुरस्कृत, महाराष्ट्र शासन सन्मानित हभप ज्ञानेश्वर महाराज वाबळे उपस्थित होते.

यावेळी हभप ज्ञानेश्वर महाराज वाबळे यांचा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हरिदास विधाते, ज्येष्ठ पत्रकार नितीन कांबळे, शिवरायांचे मुस्लिम मावळे असे प्रसिद्ध असलेले समीर शेख तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी यांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला. या सत्कार सोहळ्याने प्रा. डॉ. शाम सांगळे यांच्या शैक्षणिक योगदानाला अधोरेखित करणारा एक आदर्श समारंभ साकारला.



कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन आनंद चॅरिटेबल संस्था व महाविद्यालय प्रशासनाने केले.

# आजचे राशि भविष्य

## मेष रास

या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस गोंधळात टाकणारा असेल. तुम्हाला विनाकारण खूप धावपळ करावी लागेल, ज्यामुळे तुमचे मन अस्वस्थ होईल. काही काम पूर्ण न झाल्यामुळे तुम्ही निराश व्हाल, परंतु तुम्हाला तुमच्या बोलण्यात आणि वागण्यात संयम ठेवावा लागेल, अन्यथा समस्या उद्भवू शकते. जर तुमच्या मालमत्तेशी संबंधित कोणताही खटला न्यायालयात सुरू असेल तर आजचा या प्रकरणात तुमच्या बाजूने निकाल लागेल. तुम्ही तुमच्या विरोधकांवर विजय मिळवाल. राजकारणात काम करणाऱ्या लोकांना मोठे पद आणि आदर मिळू शकतो. जर कुटुंबात परस्पर मतभेद असतील तर ते सोडवले जाऊ शकतात.

## वृषभ रास

या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस आरोग्याच्या दृष्टीने कमकुवत राहणार आहे, म्हणून तुम्हाला तुमच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करणे टाळावे लागेल. तुम्ही नवीन व्यवसाय सुरू करू शकता, परंतु आजचा भागीदारीच्या कामात अडचणी येण्याची शक्यता आहे, म्हणून आजचापासून भागीदारीचे काम सुरू करू नका. तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे. तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल. कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास आजचा यशस्वी होईल.

## मिथुन रास

या राशीसाठी आजचा दिवस खूप शुभ राहणार आहे. तुम्हाला नवीन वाहन मिळू शकते. तुम्ही तुमच्या कुटुंबातील सदस्यांसह कोणत्याही शुभ समारंभात सहभागी होऊ शकता. मुलांशी तुमचा चांगला समन्वय असेल आणि तुम्ही त्यांच्या शिक्षणात त्यांना पाठिंबा द्याल. तुमच्यासाठी नवीन कामात गुंतवणूक करणे चांगले राहील. तुमच्या मनात असलेल्या समस्यांबद्दल तुम्ही वरिष्ठ सदस्यांशी बोलू शकता आणि त्यांच्याकडून तुम्हाला योग्य उपाय मिळतील. आईचा कोणताही जुना आजार पुन्हा उद्भवू शकतो ज्यामुळे त्रास होईल. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे.

## कर्क रास

या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस कायदेशीर बाबींमध्ये चांगला राहणार आहे. तुम्हाला उत्पन्नाचे नवीन स्रोत मिळतील. कुटुंबातील लोक तुमच्या शब्दांचा आदर करतील, ज्यामुळे तुम्ही समाधानी राहाल आणि काहीतरी खास करण्याची इच्छा प्रबळ राहील. आजचा तुम्ही तुमच्या कुटुंबाच्या आनंदासाठी काही भौतिक वस्तू खरेदी करू शकता. कोणत्याही अनोळखी व्यक्तीच्या प्रभावात येऊ नका, अन्यथा तो तुम्हाला फसवू शकतो. तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल. कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास आजचा यशस्वी होईल.

## सिंह रास

या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस अचानक लाभदायक असेल. पण आजचा गाडी चालवताना त्यांना काळजी घ्यावी लागेल कारण दुखापत आणि अपघात होण्याची शक्यता आहे. व्यवसायात कोणासोबतही भागीदारीत कोणताही करार करू नका, अन्यथा तुमची फसवणूक होऊ शकते, असा सल्ला दिला जातो. तुम्हाला एखाद्या गोष्टीची काळजी असेल. आजचा तुम्हाला तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल, अन्यथा तुमचा प्रियकर एखाद्या गोष्टीने नाराज होऊ शकतो. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

## कन्या रास

या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस तुमच्यासाठी थोडा गोंधळात टाकणारा असेल. मानसिक अस्वस्थतेमुळे तुम्हाला निर्णय घेण्यात अडचण येईल. परस्पर भांडणांमुळे कुटुंबातील वातावरण बिघडू शकते. तुमच्या मनात एखाद्या गोष्टीची भीती असेल, ज्यामुळे तुम्ही चिंतेत राहाल. आजचा एखाद्या स्पर्धेत यश मिळाल्याने विद्यार्थ्यांना आनंद होईल. नोकरी करणाऱ्या लोकांवर कामाचा ताण जास्त असेल, परंतु तरीही वरिष्ठांच्या मदतीने ते वेळेवर काम पूर्ण करतील. वैवाहिक जीवन तुमच्या जोडीदाराची तब्येत ठीक नसेल तर आजचा ती सुधारेल.

## तूळ रास

आजचा, तूळ राशीसाठी फायदेशीर राहील आणि आदर वाढेल. तुम्हाला वाहनाचे सुख मिळेल, जे लोक वाहन खरेदी करण्याचा विचार करत आहेत त्यांच्यासाठी आजचा दिवस या बाबतीत अनुकूल असेल. कुटुंबातील एखाद्या सदस्याला तुम्ही बोललेल्या गोष्टीबद्दल वाईट वाटू शकते, ज्यामुळे तो रागावू शकतो. तुमच्या अभ्यासाशी संबंधित काही प्रकरणे सोडवली जात आहेत असे दिसते. खूप दिवसांनी जुना मित्र भेटून तुम्हाला आनंद होईल. कुटुंबातील सदस्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळू शकेल. एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो.

## वृश्चिक रास

आजचा तुमच्यासाठी प्रगतीचा मार्ग मोकळा करेल. व्यवसायात नफा मिळाल्यानंतर तुम्ही आनंदी व्हाल. एखाद्याकडून ऐकलेल्या गोष्टीवरून वाद घालू नका, अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते. पैशाशी संबंधित कोणताही विषय तुम्हाला त्रास देऊ शकतो. आर्थिक बाबींमध्ये तुम्ही मित्रांकडून सल्ला घेऊ शकता परंतु इतर कोणाच्याही प्रभावाखाली कोणताही निर्णय घेऊ नका अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते. विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाचा मार्ग मोकळा होईल. विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या समस्यांबद्दल त्यांच्या शिक्षकांशी बोलावे लागू शकते. ज्येष्ठांचे मार्गदर्शन तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल.

## धनु रास

आजचा दिवस तुमच्यासाठी सामान्य असेल. तुम्हाला तुमच्या विरोधकांपासून सावध राहावे लागेल. अनावश्यक अडचणीत पडणे टाळावे आणि स्वत:च्या कामात लक्ष द्यावे. जर तुम्ही दुसऱ्यांच्या बाबतीत ढवळाढवळ केली तर तुम्ही अडचणीत येऊ शकता. जर तुमच्या तब्येतीत काही बिघाड झाला असेल तर आजचा ती सुधारेल. कुटुंबातील सदस्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळू शकेल. एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो. खूप दिवसांनी जुना मित्र भेटून तुम्हाला आनंद होईल. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

## मकर रास

या दिवस तुमच्यासाठी गोंधळात टाकणारा असू शकतो. तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल. कुटुंबातील एखाद्या सदस्याकडून तुम्हाला काही चांगली बातमी ऐकायला मिळू शकते. आजचा तुम्ही तुमच्या कामाच्या व्यवसायात काही बदल कराल परंतु आजचा कोणतेही धोकादायक पाऊल उचलू नका. आजचा तुम्हाला तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल, अन्यथा तुमचा प्रियकर एखाद्या गोष्टीने नाराज होऊ शकतो. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

## कुंभ रास

या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस चांगला राहणार आहे. व्यवसायात, तुम्हाला मागील योजनांमधून चांगले फायदे मिळू शकतात, ज्यामुळे तुम्हाला आनंद होईल. जर तुमचे कोणतेही प्रलंबित काम तुम्हाला बऱ्याच काळापासून त्रास देत असेल तर तेही पूर्ण होऊ शकते. जर तुम्हाला कोणत्याही शारीरिक समस्येमुळे त्रास झाला असेल तर तुम्हाला त्यातही आराम मिळत असल्याचे दिसून येते. विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या समस्यांबद्दल त्यांच्या शिक्षकांशी बोलावे लागू शकते. ज्येष्ठांचे मार्गदर्शन तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल. पैशाशी संबंधित कोणताही विषय तुम्हाला त्रास देऊ शकतो.

## मीन रास

या राशीसाठी आजचा दिवस चैनीच्या वस्तूंमध्ये वाढ आणणारा आहे. तुम्ही तुमच्या आयुष्यात एक मोठा निर्णय घेऊ शकता आणि वरिष्ठ सदस्य तुमच्या बोलण्याने खूश होतील. तुमच्या जोडीदाराकडून तुम्हाला भेटवस्तू मिळू शकते. तुमच्या पालकांच्या आशीर्वादाने तुम्ही आजचा यशाकडे वाटचाल कराल. आजचा व्यवसायात तुमची कमाई चांगली असेल. नोकरी करणाऱ्या लोकांवर कामाचा ताण जास्त असेल, परंतु तरीही वरिष्ठांच्या मदतीने ते वेळेवर काम पूर्ण करतील. वैवाहिक जीवन तुमच्या जोडीदाराची तब्येत ठीक नसेल तर आजचा ती सुधारेल. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते.

# छत्रपती संभाजीनगरमध्ये 'जितो मॅन्युफॅक्चरिंग अँड इकोसिस्टम ग्रोथ समिट २०२६'चा उत्साहात शुभारंभ



**छत्रपती संभाजीनग : प्रतिनिधी**

जैन इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशन (जितो) छत्रपती संभाजीनगर चॅप्टरच्या वतीने आयोजित दोन दिवसीय 'जितो मॅन्युफॅक्चरिंग अँड इकोसिस्टम ग्रोथ समिट २०२६' च्या पहिल्या दिवसाचा समारोप उत्साहपूर्ण आणि यशस्वी वातावरणात झाला. या परिषदेत उद्योगक्षेत्रातील मान्यवर तज्ज्ञ, उद्योजक, धोरणकर्ते, गुंतवणूकदार तसेच विविध क्षेत्रांतील प्रतिनिधींनी सहभाग नोंदवत औद्योगिक विकास आणि त्यातून निर्माण होणाऱ्या संधींवर सखोल चर्चा केली.

कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती संभाजीनगरच्या विकासाचा प्रवास आणि भविष्यातील क्षमता दर्शविणाऱ्या विशेष सादरीकरणाने झाली. स्वागतपर भाषणात शहरातील वेगाने होत असलेली औद्योगिक प्रगती, इलेक्ट्रिक वाहन क्षेत्रातील वाढत्या संधी, पायाभूत सुविधा विकास आणि औद्योगिक परिसंस्था निर्मितीवर प्रकाश टाकण्यात आला.

पहिल्या दिवशी विविध प्रेरणादायी व्याख्याने, संवाद सत्रे आणि परिसंवाद आयोजित करण्यात आले. यामध्ये डॉ. उदय नारंग (ओमेगा सेकी मोबिलिटी), डॉ. बाबू पद्मनाभन (स्टिअर वर्ल्ड), अजय जैन (आयआयएम कलकत्ता इनोव्हेशन अँड इन्क्युबेशन सेंटर), नितीन गुप्ता (अटेरो रिसायकलिंग), विशाल मेहता (अनवेस्ट), रजत बहल (पर्ल अलॉयज), भावेश ठक्कर (ईवाय), रोहित चतुर्वेदी (कॉग्निझंट), कृष्ण काछेला (नुवामा वेल्थ), गौरव अस्थाना (ट्रान्सजोव्हन कॅपिटल) आणि मृगांक जैन (ग्लोबल साऊथ कॅपिटल) यांच्यासह अनेक मान्यवरांनी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रस्ताविक कुमारी दर्शन संचेती यांनी केले, तर विविध सत्रांमधील मान्यवर वक्त्यांचा परिचय कुमारी भाविका जैन यांनी करून दिला. त्यांच्या प्रभावी सादरीकरणामुळे कार्यक्रमाची शोभा अधिक खुलली.

भारताच्या उत्पादन क्षेत्रातील वाढ, इलेक्ट्रिक मोबिलिटी आणि ईव्ही इकोसिस्टम, प्रगत उत्पादन तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), सर्क्युलर इकॉनॉमी, रिसायकलिंग, गुंतवणूक, विकास भांडवल आणि उद्योजकता हे चर्चेचे प्रमुख विषय होते.

वक्त्यांनी छत्रपती संभाजीनगर हे देशातील उदयोन्मुख उत्पादन आणि ईव्ही हब म्हणून वेगाने विकसित होत असल्याचे अधोरेखित केले. अलीकडील औद्योगिक गुंतवणूक, स्थानिक उद्योजकांचे प्रयत्न, उद्योग संघटनांचे सहकार्य आणि प्रशासनाच्या सकारात्मक भूमिकेमुळे शहराला नवी ओळख मिळत असल्याचे त्यांनी नमूद केले.

परिषदेला उद्योजक, उद्योगपती, व्यावसायिक, गुंतवणूकदार, स्टार्टअप संस्थापक आणि युवा व्यावसायिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. दिवसभर आयोजित नेटवर्किंग सत्रांमुळे सहभागींच्या परस्पर संवाद, सहकार्य आणि ज्ञानविनिमयाला चालना मिळाली.

आयोजकांनी सांगितले की, ही परिषद केवळ उत्पादन क्षेत्रापुरती मर्यादित नसून औद्योगिक विकासामुळे निर्माण होणाऱ्या व्यापक संधी समजून घेण्यासाठी आणि त्याचा लाभ घेण्यासाठी महत्त्वपूर्ण व्यासपीठ आहे. उत्पादन क्षेत्राच्या वाढीमुळे लॉजिस्टिक्स, वेअरहाउसिंग, पायाभूत सुविधा, रिअल इस्टेट, हॉस्पिटॅलिटी, तंत्रज्ञान आणि सेवा क्षेत्रांमध्येही मोठ्या संधी निर्माण होत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

परिषदेचा दुसरा दिवस ३० मे रोजी 'इकोसिस्टम ग्रोथ ट्रॅक'ला समर्पित असून वेअरहाउसिंग, लॉजिस्टिक्स, रिअल इस्टेट, हॉस्पिटॅलिटी, फॅमिली बिझनेस, गुंतवणूक आणि शहरी पायाभूत सुविधा या विषयांवर विशेष चर्चा होणार आहे.

जितो छत्रपती संभाजीनगर चॅप्टरतर्फे आयोजित या परिषदेचा उद्देश छत्रपती संभाजीनगर आणि देशाच्या विकासाच्या पुढील पर्वात उद्योग, समाज आणि विविध घटकांचा सक्रिय सहभाग वाढविणे हा आहे.

यावेळेस डॉ. उदय नारंग, मृगांक जैन, . कृष्णा कच्छेला, पुखराजजी पगारिया, जिनेंद्र लोढा, डिंपल पगारिया, प्रियांका परमार, अनिलकुमार संचेती, विजय भंडारी, मेहक मेहता, पारस ओस्तवाल, भावेन कामदार, गौतम संचेती, रवी खीवंसरा, प्रिया मूथा, सोनल जैन, राजेश जैन, हर्षद ओस्तवाल, नमित मुथीयान, रोहन मुनोत, मिहिर बंब, निखिल खीवंसरा, दिनेश मूथा, तुषार अजमेरा, पंकज पांडे, आलोक देवडा आदी हजर होते.

कार्यक्रमाची प्रस्तावना तसेच विविध सत्रांमधील मान्यवर वक्त्यांचा परिचय कुमारी दर्शन संचेती, कुमारी भाविका जैन आणि कुमारी ईशा ओस्तवाल यांनी प्रभावीपणे करून दिला. त्यांच्या सुबोध निवेदनामुळे आणि आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणामुळे कार्यक्रमाची रंगत अधिक खुलली.

# काडीवडगावच्या जयसिंग केसरी बैलगाडा शर्यतीत थरार; २३४ स्पर्धकांचा सहभाग, हजारोंची उपस्थिती





**वडवणी / अशोक फपाळ**

छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त वडवणी तालुक्यातील काडीवडगाव येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या जयसिंग केसरी २०२६ बैलगाडा शर्यतीत प्रचंड उत्साह आणि थरार अनुभवायला मिळाला. या भव्य स्पर्धेत तब्बल २३४ बैलगाडा स्पर्धकांनी सहभाग नोंदवला, तर शर्यत पाहण्यासाठी पंचक्रोशीतील हजारो बैलगाडा प्रेमींनी उपस्थिती लावल्याने परिसराला यात्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते.

गुरुवार (दि. २८) रोजी काडीवडगाव येथील सुसज्ज आणि भव्य मैदानावर झालेल्या या स्पर्धेची सुरुवात माजलगाव मतदारसंघाचे युवा नेते जयसिंग भैय्या सोळंके व मान्यवरांच्या हस्ते बैलगाडी व छत्रपती संभाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली.

स्पर्धेचे नियोजन अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने करण्यात आले होते. वैद्यकीय व पशुवैद्यकीय सेवा, नाश्ता-पाण्याची व्यवस्था, लाईव्ह प्रक्षेपण, साऊंड सिस्टिम, उन्हापासून संरक्षणासाठी मंडप, वाहनतळ, स्वयंसेवक व पोलीस बंदोबस्त यामुळे स्पर्धक व प्रेक्षकांची उत्तम सोय करण्यात आली.

## विजेते पुढीलप्रमाणे :

- प्रथम क्रमांक : सर्जा (नांदेवली) व सुंदर (संभाजीनगर) – रोख ₹५१ हजार व मानाच्या दोन ढाली
- द्वितीय क्रमांक : माणिक शेठ व रुद्रा – रोख ₹४१ हजार व दोन ढाली
- तृतीय क्रमांक : मेजर व सर्जा – रोख ₹३१ हजार व दोन ढाली
- चतुर्थ क्रमांक : शंभू व शंभूराजा – रोख ₹२१ हजार व दोन ढाली
- पाचवा क्रमांक : मार्शल व भाईजा
- रोख ₹१५ हजार व दोन ढाली
- सहावा क्रमांक : पवन व कार्टून – रोख ₹११ हजार व दोन ढाली
- सातवा क्रमांक : संज्या व बबल्या – रोख ₹७ हजार व दोन ढाली
- आठवा क्रमांक : नायक व बल्मा – रोख ₹५ हजार व दोन ढाली

विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिकांचे वितरण करण्यात आले.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तालुकाध्यक्ष बजरंग आप्पा साबळे व त्यांच्या सहकाऱ्यांनी या स्पर्धेचे उत्कृष्ट नियोजन केले. कार्यक्रमासाठी जयसिंग भैय्या सोळंके, नगराध्यक्ष शेषराव बापू जगताप, संभाजी तात्या शिंदे, औदुंबर काका सावंत, डॉ. दुधाने, सचिन भैय्या लंगडे, विश्वनाथ शिंदे, आनंद भैय्या काळे, विश्वासराव आगे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

हजारो प्रेक्षकांच्या साक्षीने पार पडलेली ही बैलगाडा शर्यत शांततेत, शिस्तबद्ध आणि खेळीमेळीच्या वातावरणात यशस्वीरीत्या संपन्न झाली.

# साईबाबांना १ कोटींचा सुवर्ण मुकूट अर्पण; लखनौमधील साईभक्ताच्या भक्तीची शिर्डीसह देशभरात चर्चा



शिर्डी : शिर्डीच्या साईदरबारात श्रद्धा, भक्ती आणि दानशूरतेचं आणखी एक अनोखं उदाहरण समोर आलं आहे. सोन्याच्या वाढत्या किमतींच्या पार्श्वभूमीवरही साईभक्तांची किती श्रद्धा आहे, याचा प्रत्यय पुन्हा एकदा आला आहे. लखनौ येथील साईभक्त गोविंद गोयल यांनी साईबाबांना तब्बल १ कोटी रुपये किमतीचा सुवर्ण मुकूट अर्पण केला असून, या दानाची शिर्डीसह देशभरात चर्चा रंगली आहे.

शुक्रवारी झालेल्या मध्यान्ह आरतीदरम्यान गोविंद गोयल आणि त्यांच्या कुटुंबियांनी साईबाबांच्या चरणी हा सुवर्ण मुकूट अर्पण केला. या मुकुटाचे वजन सुमारे ७८२ ग्रॅम असून, सध्याच्या बाजारभावानुसार त्याची किंमत जवळपास १ कोटी १० लाख रुपये असल्याची माहिती भाविकांनी दिली. मंदिरात विधिवत पूजा आणि आरती पार पडल्यानंतर हा सुवर्ण मुकूट साईबाबांना समर्पित करण्यात आला. या विशेष प्रसंगी मंदिर परिसरात उपस्थित असलेल्या हजारो भाविकांनी हा ऐतिहासिक क्षण अनुभवला. या दानशूरतेबद्दल साई संस्थानच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी गोविंद गोयल आणि त्यांच्या परिवाराचा सत्कार करून आभार व्यक्त केले. मुकुट अर्पण सोहळ्यानंतर मंदिर परिसरात या दानाची मोठ्या प्रमाणावर चर्चा सुरू होती.

शिर्डी साई संस्थानला दरवर्षी कोट्यवधी रुपयांचं दान

शिर्डी हे देश-विदेशातील कोट्यवधी साईभक्तांचे श्रद्धास्थान मानले जाते. दररोज हजारो भाविक साईबाबांच्या दर्शनासाठी शिर्डीत दाखल होत असतात. अनेक भाविक आपली श्रद्धा व्यक्त करण्यासाठी रोख रक्कम, सोने-चांदीच्या वस्तू, मौल्यवान दागिने तसेच विविध स्वरूपातील भेटवस्तू साई संस्थानला अर्पण करतात. आता या परंपरेत एक कोटी रुपयांहून अधिक किमतीच्या सुवर्ण मुकुटाची भर पडली आहे.

विशेष म्हणजे, गेल्या काही वर्षांत सोन्याच्या किंमतींमध्ये मोठी वाढ झाली असली तरी साईभक्तांकडून सोन्याच्या वस्तू आणि दागिने दान करण्याचा ओघ कायम असल्याचे दिसून येत आहे. श्रद्धा आणि विश्वासाच्या भावनेतून भाविक साईचरणी आपले योगदान देत असल्याचे या घटनेतून पुन्हा अधोरेखित झाले आहे.

गोविंद गोयल परिवाराने साईबाबांप्रती असलेली आपली निष्ठा, भक्ती आणि कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा सुवर्ण मुकूट अर्पण केल्याचे सांगितले जात आहे. मध्यान्ह आरतीच्या वेळी हा मुकुट अर्पण झाल्यानंतर अनेक भाविकांनी या दानशूरतेचे स्वागत केले. साईबाबांवरील श्रद्धा आणि विश्वास हीच सर्वात मोठी संपत्ती असल्याच्या भावना अनेकांनी व्यक्त केल्या.

शिर्डीतील साईभक्तीचा जागतिक स्तरावर प्रभाव

दरम्यान, शिर्डी साई संस्थानकडे दरवर्षी कोट्यवधी रुपयांचे दान जमा होत असते. रोख रक्कम, सोने, चांदी, दागिने आणि इतर मौल्यवान वस्तूंच्या माध्यमातून भाविक आपली श्रद्धा व्यक्त करत असतात. अशा प्रकारच्या सुवर्णदानामुळे शिर्डीतील साईभक्तीचा प्रभाव केवळ भारतापुरता मर्यादित नसून जागतिक स्तरावर पोहोचल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

एकीकडे वाढती महागाई आणि आर्थिक आव्हाने असताना, दुसरीकडे श्रद्धा, भक्ती आणि विश्वासाच्या बळावर भाविक साईचरणी आपलं सर्वस्व अर्पण करत असल्याचे हे उदाहरण पुन्हा एकदा शिर्डीत पाहायला मिळाले आहे. त्यामुळे गोविंद गोयल यांनी अर्पण केलेला हा सुवर्ण मुकूट सध्या शिर्डीतील भाविकांमध्ये आणि देशभरातील साईभक्तांमध्ये चर्चेचा विषय ठरला आहे.

सांज दैनिक बीड वास्तव

सायं. दैनिक बीड वास्तव हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक जितेंद्र कान्होजीराव सिरसाट** शुभेच्छा प्रिंटिंग प्रेस एमआयडिसी. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून बीड वास्तव ऑफिस बशीर गंज चौक, बीड ४३११२२ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. **संपादक – जितेंद्र कान्होजीराव सिरसाट, निवासी संपादक – अरविंद ओव्हाळ** (या अंकामध्ये छापलेल्या मजकूराशी मालक संपादक प्रकाशक सहमत असतीलच असे नाही) (वाद-विवाद बीड न्याय कक्षेत) मो. 9022952922



## गेवराई पोलिसांची कारवाई; अवैध वाळूसह ८ लाख ६ हजारांचा ट्रॅक्टर जप्त

गेवराई / प्रतिनिधी :
गेवराई पोलिसांनी अवैध वाळू वाहतुकीविरोधात कारवाई करत १ ब्रास वाळूसह ट्रॅक्टर व ट्रॉली असा एकूण ८ लाख ६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांच्या निर्देशानुसार हिंगणगाव परिसरात २९ मे २०२६ रोजी सकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास पोलिस पथक गस्त घालत असताना पाथरवाला मार्गावर संशयित ट्रॅक्टर आढळून आला. पोलिसांना पाहताच चालक वाहन सोडून पसार झाला. पोलिसांनी महिंद्रा अर्जुन ५५५ डीआय ट्रॅक्टर, ट्रॉली व १ ब्रास वाळू असा एकूण ८ लाख ६ हजार रुपयांचा मुद्देमाल ताब्यात घेतला. याप्रकरणी गेवराई पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ३३०/२०२६ नोंद करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल कटके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक किशोर पवार व त्यांच्या पथकाने केली.

## पुराव्याअभावी वाळू चोरी प्रकरणातील आरोपीची निर्दोष मुक्तता



➤ माजलगाव : प्रतिनिधी
सन २०१७ मधील वाळू चोरी प्रकरणात आरोपी भारत मुरलीधर डावरे यांची माजलगाव येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी आर. बी. पोळ यांनी पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता केली.

माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात १३ जुलै २०१७ रोजी गुन्हा क्रमांक २२९/२०१७ अंतर्गत भादंवि कलम ३७९, १८८ तसेच महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन कायदा आणि महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान सादर करण्यात आलेले पुरावे आरोपीविरुद्ध दोष सिद्ध करण्यासाठी पुरेसे नसल्याचे न्यायालयाने नमूद केले. त्यानुसार भारत डावरे यांची निर्दोष मुक्तता करण्याचा आदेश देण्यात आला.

या प्रकरणात आरोपीतर्फे ॲड. डी. एच. कसबे यांनी बाजू मांडली. निकालानंतर त्यांचे विविध स्तरांतून अभिनंदन होत आहे.

## २५ एकर जमिनीच्या वादातून सहा जणांची निर्घृण हत्या

● पान ४ वरून... अंतरावर सहा मृतदेह आढळून आले. मृतांच्या डोक्यावर आणि मानेवर धारदार शस्त्रांनी गंभीर वार करण्यात आल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे.

पोलिसांची धाव, तपासाला वेग

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. अप्पुगौडा आणि त्याच्या साथीदारांनी हा हल्ला केल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. अप्पुगौडा हा भीमा खोऱ्यातील जुन्या खून प्रकरणातील मृत मानकप्पा मास्टरचा नातेवाईक असल्याची माहिती समोर आली आहे. या हल्ल्यात शेतात कामासाठी आलेले मजूर शब्बीर नदाफ यांचाही मृत्यू झाला. विजापूरचे पोलीस अधीक्षक लक्ष्मण निंबरगी यांच्या नेतृत्वाखालील पथकाने घटनास्थळी पाहणी करून पंचनामा केला. मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आले असून चडचण पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

निराळे कुटुंब हे महाराष्ट्र आणि कर्नाटकातील शेतकऱ्यांमध्ये विशेष ओळख असलेले नाव आहे. खिल्लार जातीच्या बैलांचे संगोपन आणि संवर्धन करण्यासाठी हे कुटुंब प्रसिद्ध आहे. प्रत्येक शेतकऱ्याला आपल्या गोठ्यात खिल्लार बैल असावा, अशी इच्छा असते आणि त्यामुळे निराळे कुटुंबाची मोठी प्रतिष्ठा निर्माण झाली होती. चडचण येथील प्रसिद्ध यात्रा सुरू करण्यामागेही निराळे कुटुंबाचा मोठा वाटा असल्याचे सांगितले जाते. या यात्रेसाठी महाराष्ट्र आणि कर्नाटकातून मोठ्या संख्येने शेतकरी खिल्लार बैल खरेदी करण्यासाठी येत असत. निराळे कुटुंबाची चौथी पिढी आजही या परंपरेचे जतन करत होती. मात्र, जमिनीच्या वादातून झालेल्या या भीषण हत्याकांडामुळे संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

# माजलगावात राजमाता अहिल्याबाई होळकर जयंतीनिमित्त भव्य जन्मोत्सव सोहळ्याचे आयोजन

➤ अरविंद ओव्हाळ : प्रतिनिधी
सकल धनगर समाज, माजलगाव विधानसभा मतदारसंघाच्या वतीने पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीनिमित्त भव्य जन्मोत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम रविवार, दि. ३१ मे रोजी उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात येणार आहे.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ९ वाजता पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर चौक येथे पिवळ्या ध्वजाच्या ध्वजारोहणाने होणार आहे. हा कार्यक्रम मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडणार असून त्यानंतर सकाळी १० वाजता समाजातील महिला भगिनींच्या हस्ते महाआरती व अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमात विविध क्षेत्रातील मान्यवर तसेच समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाचे उद्घाटन भाजपा विधानसभा प्रमुख माधव निर्मळ यांच्या हस्ते होणार असून अध्यक्षस्थानी शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले राहणार आहेत. विशेष उपस्थिती म्हणून माजी जिल्हा परिषद सदस्य प्रकाश गवते, सरपंच राज अर्जुन व सरपंच नारायण भले उपस्थित राहतील.

तसेच प्रमुख अतिथी म्हणून बंडू खांडेकर, ज्ञानेश्वर सरवदे, यशवंत गायके, अण्णासाहेब वगरे, अशोकराव डोणे, बबनराव सरवदे, भगवानराव सरवदे, ॲड. विनायकराव लवटे, सुभाषराव गडदे, डॉ. भारत वाघमोडे, लक्ष्मीकांत सोन्नर, नारायण सातपुते, मुक्तीराम आबुज, संजय धरपडे, बाळासाहेब सोनसळे, ह.भ.प. शिवाजी महाराज गडदे, विशाल देवकते, संपतराव हराळ, भागवत गायकवाड, ॲड. जयराम सजगणे आणि रणजीत रुपनर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

या जन्मोत्सव सोहळ्यास माजलगाव मतदारसंघातील नागरिकांनी व समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन संयोजक विलास नेमाने, संतोष देवकते, अध्यक्ष जयंत अशोक चोरमले, रामेश्वर शिंदे, रणजीत चोरमले, सुरेश देवकते, आप्पासाहेब तायडे, प्रथमेश बोरखडे, अशोक देवकते, अर्जुन भुतकर, हनुमान गावडे, हरिचंद्र कुंडकर, गणेश हजारे, दत्ता मुळे, दिगंबर घुमरे, अनिल आवाड, अर्जुन दिवटे, सुभाष गवळी, अशोक गवळी, हनुमान बाबरे, रामेश्वर काळे, सचिन वगरे आणि रामेश्वर सरवदे यांनी केले आहे.



### महत्वाचे ठळक मुद्दे
● ३१ मे रोजी विविध कार्यक्रमांचे आयोजन ● पिवळ्या ध्वजाचे ध्वजारोहण होणार ● महिलांच्या हस्ते महाआरती व अभिवादन सभा ● विविध मान्यवरांची उपस्थिती राहणार

## प्रनिल समुद्रेची आंतरराष्ट्रीय डान्स स्पर्धेसाठी निवड; अंदमान-निकोबार येथे होणार स्पर्धा

➤ माजलगाव : प्रतिनिधी
अंदमान-निकोबार येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय डान्स स्पर्धेसाठी माजलगाव येथील प्रनिल समुद्रे यांची निवड झाली आहे. पुणे येथे नुकत्याच पार पडलेल्या राष्ट्रीय स्तरावरील नृत्य स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावत त्यांनी हे यश संपादन केले.

पुणे येथे अखिल भारतीय सांस्कृतिक संघ आणि युनेस्को यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय नृत्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत अंबाजोगाई येथील भिमाशंकर शिंदे यांच्या नवकेशर डान्स ॲण्ड ड्रामा अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली.



यामध्ये प्रनिल समुद्रे यांनी प्रथम क्रमांक मिळवून आंतरराष्ट्रीय स्पर्धेचे तिकीट मिळवले.

तसेच वंशिका मुंडे आणि श्रावणी साखरे यांनी द्वितीय क्रमांक पटकावला. अद्या मोमले हिला 'चेअरमन अवॉर्ड' देऊन गौरविण्यात आले. तर रुपाली लोंढे आणि आर्यन नांदुरे यांनीही आपल्या वयोगटात उत्कृष्ट सादरीकरण करत विशेष चमक दाखवली.

या सहाही डान्सर्सनी राष्ट्रीय स्पर्धेत यश मिळवत अकॅडमीचे नाव उंचावले आहे. त्यांच्या या निवडीबद्दल सर्व स्तरांतून कौतुक होत असून अंदमान-निकोबार येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

### महत्वाचे ठळक मुद्दे
● पुणे येथे झालेल्या राष्ट्रीय नृत्य स्पर्धेत प्रनिल समुद्रे प्रथम
● अंदमान-निकोबार येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड
● नवकेशर डान्स ॲण्ड ड्रामा अकॅडमीच्या सहा कलाकारांचे यश
● विविध गटांमध्ये स्पर्धकांनी मिळवले उल्लेखनीय यश

## मिर्झा नियामत बेग यांना 'शिक्षणभूषण जीवनगौरव पुरस्कार २०२६' जाहीर

➤ आष्टी / प्रतिनिधी :
सामाजिक, शैक्षणिक व अल्पसंख्याक समाजाच्या उन्नतीसाठी उल्लेखनीय योगदान देणारे बीड जिल्हा परिषदेचे माजी शिक्षण सभापती तथा संस्थाचालक मिर्झा नियामत बेग यांना 'शिक्षणभूषण जीवनगौरव पुरस्कार २०२६' जाहीर झाला आहे.



साप्ताहिक युवा लोकमित्रच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित राज्यस्तरीय पुरस्कार सोहळ्यात त्यांचा गौरव करण्यात येणार आहे. १९८४ पासून राजकारण व समाजकारणात सक्रिय असलेल्या बेग यांनी उर्दू शिक्षणाच्या प्रसारासाठी बीड व अहमदनगर जिल्ह्यात अनेक शैक्षणिक संस्था स्थापन करून हजारो विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली. हा पुरस्कार २० जून २०२६ रोजी बीड येथे आयोजित भव्य राज्यस्तरीय सोहळ्यात प्रदान करण्यात येणार आहे. पुरस्कार जाहीर होताच विविध क्षेत्रांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# मनूर वसाहतीतील विद्यार्थ्यांसाठी इयत्ता ६ वी वर्ग वाढीची मागणी

➤ माजलगाव : प्रतिनिधी
तालुक्यातील मनूर वसाहत येथील जिल्हा परिषद शाळेमध्ये इयत्ता ६ वीचा वर्ग तात्काळ सुरू करण्यात यावा, या मागणीसाठी आझाद क्रांती सेनेच्या वतीने माजलगाव येथील गटशिक्षणाधिकारी कार्यालयात निवेदन देण्यात आले.

मनूर वसाहत परिसरातील विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी अन्य ठिकाणी जावे लागत असल्याने त्यांची मोठ्या प्रमाणात शैक्षणिक हेळसांड होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांचे भविष्यातील शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी शाळेत इयत्ता ६ वीचा वर्ग वाढविण्याची मागणी करण्यात आली.






यासंदर्भातील अंतिम प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी जतीन रहेमान यांच्या टेबलावर असून, लवकरच इयत्ता ६ वी वर्गाला मंजुरी मिळणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

निवेदन देताना आझाद क्रांती सेनेचे अशोक ढगे, शालेय समिती अध्यक्ष अविनाश ढगे, ग्रामपंचायत सदस्य सय्यद शकील, ग्रामपंचायत सदस्य राहुल क्षीरसागर, युवा नेते मल्हारी ढगे, विनोद ढगे, बाळू उपाडे, अशोक कसबे आदी उपस्थित होते. दरम्यान, गटशिक्षणाधिकारी शेख सर तसेच पोटभरे सर यांनी निवेदन स्वीकारले.

### महत्वाचे ठळक मुद्दे
● जिल्हा परिषद शाळा मनूर वसाहत येथे इयत्ता ६ वी वर्ग सुरू करण्याची मागणी
● विद्यार्थ्यांची शैक्षणिक हेळसांड थांबविण्याची मागणी
● गटशिक्षणाधिकारी यांना निवेदन सादर
● अंतिम प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी जतीन रहेमान यांच्या स्तरावर
● लवकरच इयत्ता ६ वी वर्ग मंजुरीची अपेक्षा

## महा जम्बो शब्दकोडे



### आडवी विधाने
१. देव आनंद, साधना यांचा सुपरहिट चित्रपट
५. मेलेला, ठार
७. मेळ, जुळणी
९. नोकर, सेवक
१०. गळ्यामागील भाग, सत्कार
११. एक हजार किलोचे वजन
१२. राजेश खन्ना, रेखा, राज बब्बर यांचा चित्रपट
१६. शशी कपूर, आशा पारेख यांचा चित्रपट
१८. पोपट, कीर, राघू
२०. सहा धावांचा क्रिकेटमधील फटका
२२. कुबेराचा सेवक
२३. वजनदार
२४. कापरे, थरथर
२५. भारलेला, ताब्यात आलेला
२७. दुर्दशा, वाईट अवस्था
२८. संजय दत्तची प्रभावी भूमिका असलेला चित्रपट
२९. मूषक
३०. किल्ल्याभोवतीची मजबूत भिंत
३१. दानशूर, मोठ्या मनाचा
३३. लाकूड कापण्याचे हत्यार
३५. नूतन, नवा
३६. तलवार
३८. कर, हस्त
४१. अभिप्राय
४३. अंगावरील बारीक मऊ केस
४५. खानेसुमारी, शिरगणती
४६. अज, बकरा
४८. शेंगेचे कवच
५०. धरित्री, पृथ्वी
५२. एका पक्ष्याचे नाव
५४. बाण, शर
५५. नाडी, शीर, धमनी
५७. अजगर
५८. पर्वत; जिन्नस
५९. इटलीची राजधानी
६१. सौभाग्यवतीचे संक्षिप्त रूप
६२. मंडप
६३. वडीलभाऊ; विनोद मेहराचा चित्रपट
६४. कोषाध्यक्ष
६७. दुःख, वेदना
६८. झाड, वृक्ष
६९. बकऱ्याचे कमावलेले कातडे
७१. युद्ध, रण
७३. दोरी, दोर
७५. सफेद, पांढरा
७७. जमिनीवर अंथरण्याचे जाडजूड बिछाईत
८०. लोणी
८१. अवहेलना, मानखंडना
८२. धर्मेंद्र-जीतेंद्र जोडीचा हिट चित्रपट

### उभी विधाने
१. उत्तर कुमार, शर्मिला टागोर यांचा चित्रपट
२. वर्ष, साल
३. नाटक-सिनेमात काम करणारा पुरुष
४. सोने, सुवर्ण
५. हरिणाच्या डोळ्यांसारखे डोळे असलेली सुंदर स्त्री
६. होडी, मचवा, नाव
७. मोर्चेबांधणी, एकत्र करणे
८. प्रतिबंध, बंदी (हिंदी)
९. 'शुक्रतारा' हा कार्यक्रम सादर करणारे गायक - अरुण **
१२. अभिनय, नट्टाफट्टा
१३. पक्ष्याच्या डोक्यावरील शेंडी
१४. यज्ञ, यजन
१५. गगन, नभ
१७. योग्य निर्णय, निवाडा
१९. मडक्याचा तुकडा
२१. ताजा, प्रफुल्लित
२४. फाणस, लालटेन
२६. नाराज, निराश
२८. कळलाव्या; ब्रह्मदेवाचा मानसपुत्र
३०. शरीर - अंतःकरण-पैसा इत्यादी सर्वस्व
३२. फाशांवरून शकुन पाहण्याची विद्या
३४. तृष्णा
३७. अंत, अखेर, समाप्ती
३९. धट्टाकट्टा, मजबूत, बळकट
४०. श्वापद, पशू
४२. तोटा, हानी
४४. राजेश खन्ना, शर्मिला टागोर, फिरोज खान यांचा चित्रपट
४७. भीती, भय
४९. एक हिंदी अभिनेत्री - ** अग्निहोत्री
५१. गायन म्हणण्याची विशिष्ट धाटणी, शैली
५३. भारताच्या पहिल्या महिला राज्यपाल - **** नायडू
५६. परस्परांपासून सारख्या अंतरावर असलेला
५७. आमंत्रण, बोलावणे
६०. अंतःकरण
६५. नोकर, सेवक
६६. अरबी वर्षाचा नववा महिना
६९. नेत्र, डोळे
७०. आर्थिक सामर्थ्य
७२. धुळीचा कण, रेणू
७४. मुस्लिमांचा नमस्कार
७५. पती, मालक, कारभारी
७६. कढवलेले लोणी
७८. मकरंद
७९. पराक्रमी, लढवय्या

### महा जम्बो शब्दकोडे कालचे उत्तर



# नदीजोड प्रकल्पाअंतर्गत समुद्रात वाहून जाणारे पाणी आष्टी पाटोदा शिरूर या दुष्काळी भागाला मिळावे

## माजी आमदार भीमराव धोंडे व माजी आमदार बाळासाहेब आजबे यांची मागणी





**आष्टी : प्रतिनिधी**
महाराष्ट्रातील नदीजोड प्रकल्पाअंतर्गत समुद्रात वाहून जाणाऱ्या २०० टीएमसी पाण्यापैकी १५ ते २० टीएमसी पाणी आष्टी पाटोदा शिरूर या दुष्काळी भागाला मिळावे अशी मागणी राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नेते व माजी आ. भीमराव धोंडे तसेच माजी आ. बाळासाहेब आजबे यांनी शिष्टमंडळामार्फत जलसंपदा विभागाचे उत्तर महाराष्ट्र प्रदेश, नाशिकचे मुख्य अभियंता प्रकाश मिसाळ यांच्याकडे निवेदनाव्दारे केली.

याबाबत अधिक माहिती अशी की, माजी आमदार भीमराव धोंडे व माजी आमदार बाळासाहेब आजबे यांच्यासह शिष्टमंडळात १०० पेक्षा जास्त शेतकरी व कार्यकर्ते सहभागी झाले होते.

नाशिकचे विभागाचे मुख्य अभियंता प्रकाश मिसाळ यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, बीड जिल्ह्यातील आष्टी, पाटोदा व शिरूर (कासार) तालुके मराठवाड्यातील अतिशय अवर्षणप्रवण क्षेत्रात येतात. या भागात दरवर्षी पिण्याच्या पाण्याचे तीव्र दुर्भिक्ष निर्माण होते. परिणामी येथील नागरिकांना पिण्याच्या व शेती पाण्यासाठी मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागते. तसेच रोजगाराच्या अभावामुळे अनेकांना ऊसतोड व इतर कामांसाठी स्थलांतर करावे लागते. तसेच या भागात जानेवारी महिन्यापासूनच पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होते. त्यामुळे येथील जनतेचे जीवनमान अत्यंत कठीण बनले आहे. राज्याचे मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांनी देखील समुद्रात वाहून जाणारे पाणी दुष्काळग्रस्त भागांना उपलब्ध करून देण्याचा मनोदय व्यक्त केला आहे. त्या अनुषंगाने समुद्रात वाहून जाणारे पाणी या तीन तालुक्यातील अवर्षण प्रवण क्षेत्रात नदीजोड प्रकल्पाच्या माध्यमातून मिळाल्यास दुष्काळी भागातील जवळपास २०० गावांना याचा फायदा होईल.
यावेळी तालुक्यातील दुष्काळी भागाला समुद्रात वाहून जाणाऱ्या २०० टीएमसी पाण्यापैकी १५ ते २० टीएमसी पाणी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन जलसंपदा विभागाचे उत्तर महाराष्ट्र प्रदेश, नाशिकचे मुख्य अभियंता प्रकाश मिसाळ यांनी दिले. यावेळी पाटोदा कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती पांडुरंग नागरगोजे, जि. प. चे माजी सदस्य रामराव खेडकर, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे तालुकाध्यक्ष काकासाहेब शिंदे, महेश कारखान्याचे व्हाईस चेअरमन दादासाहेब जगताप, रिपाईंचे तालुकाध्यक्ष अशोक साळवे, माजी जि. प. सदस्य सतिश झगडे, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे तालुकाध्यक्ष दिपक घुमरे, माजी सरपंच झुंबर चव्हाण, कारखान्याचे संचालक बजरंग कर्डीले, माजी शिक्षण सभापती नियामत बेग, संचालक अॅड. रत्नदिप निकाळजे, उद्धव विधाते, शहादेव गर्जे, बाबासाहेब वाघुले, प्रा. केशव शिंदे, अशोक खेडकर, अंकुश मुंढे, संतोष गोल्हार, शहादेव गर्जे तसेच राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष विश्वास नागरगोजे, जि. प. चे माजी सदस्य सुरेश माळी, महादेव दानवे, चेअरमन राजाराम ननवरे, नानाभाऊ वाडेकर, विठ्ठल लांडगे, बाबुराव जाधव, माजी सभापती अनिल जायभाय, बाळासाहेब शेकडे, संदीप नागरगोजे, सागर वनवे, शाम हुले, तात्यासाहेब लाड, सचिन जायभाय, माजी सरपंच भागवत वारे, डॉ. प्रभाकर कवठेकर, दिगंबर ठोंबरे, सुभाष ठोंबरे, सुरेश शेकडे, कचरू काळे, दादासाहेब सव्वाशे, उद्धव शिरसाठ, सावळेराम जायभाय, अभिलाश गाडेकर, वैभव बडे, महारूद्र खेडकर व इतर अनेक कार्यकर्ते व शेतकरी उपस्थित होते.

विशेष



## पैठण तहसीलदार ज्योती पवार यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची आ.भा.मराठा महासंघाची मागणी

**पैठण/ प्रतिनिधी :**
पैठण तालुक्यातील चनकवाडी बंधाऱ्याजवळ मागील काही दिवसांपासून अवैध वाळू उपसा करण्यात येत आहे.

या साठी वाळू चोरांनी चक्क या बंधाऱ्याला खेटून पोकलेन मशीनच्या सहाय्याने रस्ता बनवला आहे. या रस्त्यामुळे बंधाऱ्याच्या सुरक्षिततेला धोका निर्माण झाल्याचा गंभीर आरोप करत पैठणच्या तहसीलदार ज्योती पवार यांच्यासह संबंधितांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी अखिल भारतीय मराठा महासंघाचे पैठण युवक तालुकाध्यक्ष विशाल काळे यांनी केली आहे. याबाबत पैठण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक यांना निवेदन दिले आहे. निवेदनात नमूद केल्यानुसार दगडी धरण उपविभाग क्र.१, नाथनगर उत्तर पैठण यांनी २ फेब्रुवारी रोजी या संदर्भात काढलेल्या पत्रात चनकवाडी बंधाऱ्याजवळ पोकलेनद्वारे जो रस्ता तयार करण्यात आला आहे. यामुळे बंधाऱ्याच्या पायाभूत संरचनेस व एकूण त्याच्या सुरक्षिततेस धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याचे स्पष्टपणे नमूद करण्यात आलेले आहे. त्या सोबतच या प्रकरणी विविध दैनिकांमध्ये ही या विषयी बातम्या प्रसिद्ध झाल्याचे सदर निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्या सोबतच पैठण तहसीलदार ज्योती पवार यांच्यावर भारतीय न्याय संहिता अंतर्गत कलम १२०कलम ३३६ (ब) गुन्हेगारी कट, कलम ४०९ लोकसेवकांनी केलेला विश्वासघात, जिवाला धोका निर्माण करणे, कलम १६६ कायद्याचे उल्लंघन करणे, कलम २०१ पुरावे नष्ट करणे तसेच भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा १९८८ मधील कलम ७ व १३ (१) (ड) आणि पर्यावरण संरक्षण कायद्यान्वये कारवाईची मागणी अखिल भारतीय मराठा महासंघाचे युवा तालुका अध्यक्ष विशाल काळे यांनी पैठण पोलिस ठाणे येथे दिलेल्या निवेदनात केली असून निवेदनावर सुभाष नवथर, योगेश माने, मंगेश शेळके, सोमनाथ बल्लाळ, नंदकिशोर मगरे इत्यादींच्या स्वाक्षऱ्या आहेत.



## अवैध वाळू उत्खननाविरोधात माजलगाव ग्रामीण पोलिसांची मोठी कारवाई; ३०.३६ लाखांचा मुद्देमाल जप्त

**माजलगाव : प्रतिनिधी**
अवैध वाळू उत्खनन व वाहतूक याविरोधात माजलगाव ग्रामीण पोलिसांनी कडक कारवाई करत भारत बेंज हायवा वाहनासह तब्बल ३० लाख ३६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक चेतना तिडके यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच परिविक्षाधीन सहाय्यक पोलीस अधीक्षक राहुल कुमार (IPS) यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली.

**महत्वाचे ठळक मुद्दे**
- माजलगाव ग्रामीण पोलिसांची अवैध वाळू उत्खननाविरोधात मोठी कारवाई
- भारत बेंज हायवा वाहनासह ३०.३६ लाखांचा मुद्देमाल जप्त
- गोदावरी नदी पात्रातून अवैध वाळू उपसा सुरू असल्याची माहिती
- चालकाविरुद्ध गुन्हा दाखल, पुढील तपास सुरू

दिनांक २९ मे २०२६ रोजी पोलिसांना गोपनीय माहिती मिळाली की, मौजे हिवरा शिवारातील गोदावरी नदी पात्रातून अवैधरित्या वाळू उपसा करून ती भारत बेंज हायवा वाहनाद्वारे वाहतूक केली जात आहे. या माहितीच्या आधारे सकाळी सुमारे ७ वाजता पोलिसांनी सापळा रचून छापा टाकला.

या कारवाईदरम्यान भारत बेंज हायवा वाहन किंमत अंदाजे ३० लाख रुपये व सहा ब्रास वाळू किंमत ३६ हजार रुपये असा एकूण ३० लाख ३६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पंचांसमक्ष जागीच ही जप्तीची कारवाई करण्यात आली.

याप्रकरणी वाहन चालक तुकाराम कचरुबा आव्हाड (रा. नित्रुड, ता. माजलगाव, जि. बीड) याच्याविरुद्ध फिर्याद देऊन भारतीय न्याय संहिता कलम ३०३ (२) तसेच इतर लागू कायद्यांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

सदर कारवाईत पोउपनि राठोड, पोहेका १६७५ राऊत, पोकॉ १९४७ बाबरे, पोकॉ २११५ चव्हाण तसेच माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्याचे कर्मचारी सहभागी होते.

## २५ एकर जमिनीच्या वादातून सहा जणांची निर्घृण हत्या

विजापूर : जमिनीच्या वादातून नातेसंबंध रक्तरंजित झाल्याची धक्कादायक घटना कर्नाटकमधील विजापूर जिल्ह्यात घडली आहे. शेतजमिनीच्या वादातून सहा जणांची निर्घृण हत्या केल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे, महाराष्ट्र–कर्नाटक सीमेवर खिल्लार बैलांचे संगोपन करणारे आणि 'निराळे सावकार' म्हणून प्रसिद्ध असलेल्या निराळे कुटुंबातील सदस्य या हल्ल्यात मृत्युमुखी पडले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, विजापूर जिल्ह्यातील चडचण तालुक्यातील गोविंदपूर गावात ही घटना घडली. गावातील निराळे आणि गोळगी कुटुंबांमध्ये २५ एकर शेतीच्या मालकीवरून अनेक दिवसांपासून वाद सुरू होता. संबंधित जमीन निराळे कुटुंबीयांनी खरेदी केली होती. मात्र, गोळगी कुटुंबातील एका नातेवाईकाने या व्यवहाराला विरोध दर्शवला होता. याच कारणावरून दोन्ही कुटुंबांमध्ये अनेकदा वाद झाले होते. तरीही निराळे कुटुंबाने जमीन खरेदीचा निर्णय कायम ठेवला होता.

शेतात साफसफाईसाठी गेले आणि झाला हल्ला

मयत रेवणसिद्धप्पा निराळे, दुंडप्पा रेवणसिद्धप्पा निराळे, शिवपुत्र रेवणसिद्धप्पा निराळे, चंद्रशेखर निराळे आणि शब्बीर अत्तार हे शेतात साफसफाईच्या कामासाठी गेले होते. त्याचवेळी गोळगी कुटुंबातील काही सदस्य घटनास्थळी पोहोचले. दोन्ही गट आमनेसामने आल्यानंतर वाद उफाळून आला आणि त्याचे रूपांतर हिंसाचारात झाले. आरोपींनी प्रथम गोळीबार केल्याची माहिती समोर आली आहे. त्यानंतर धारदार शस्त्रांनी हल्ला करत सहा जणांची निर्घृण हत्या करण्यात आली. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

शेताच्या रस्त्यावर काही फुटांच्या अंतरावर सहा मृतदेह

या हल्ल्यात चडचण नगरपंचायतीचे सदस्य चेतन निराळे यांच्यासह त्यांच्या कुटुंबातील सदस्यांचा मृत्यू झाला आहे. मृतांमध्ये रेवणसिद्धप्पा निराळे, दुंडप्पा रेवणसिद्धप्पा निराळे, शिवपुत्र रेवणसिद्धप्पा निराळे, चंद्रशेखर निराळे, शब्बीर नदाफ अत्तार आणि आणखी एका व्यक्तीचा समावेश आहे. घटनेतील सर्वात धक्कादायक बाब म्हणजे शेताच्या रस्त्यावर अवघ्या काही फुटांच्या ● पान ३ वर...

## आदर्श शिक्षक सोपानराव काकडे यांचा ३१ मे रोजी सेवापूर्ती गौरव सोहळा

**आष्टी : प्रतिनिधी**
जि.प. प्राथमिक शाळा, कोहिणीचे मुख्याध्यापक तथा आदर्श शिक्षक सोपान मुरलीधर काकडे हे ३१ वर्षांच्या प्रदीर्घ शैक्षणिक सेवेनंतर ३१ मे रोजी सेवानिवृत्त होत आहेत. त्यांच्या सन्मानार्थ रविवार, ३१ मे २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता मोरेश्वर



मंगल कार्यालय, आष्टी येथे सेवापूर्ती गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. १९९५ मध्ये बेलगाव येथून शिक्षक म्हणून सेवेला सुरुवात केलेल्या काकडे गुरुजींनी शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिले.

या कार्यक्रमाला आमदार सुरेश धस अध्यक्षस्थानी राहणार असून खासदार बजरंग सोनवणे यांच्यासह राजकीय, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

कार्यक्रमानंतर स्नेहभोजनाची व्यवस्था करण्यात आली असून हार–तुरे व भेटवस्तू न आणण्याचे आवाहन काकडे परिवाराने केले आहे.

## श्रीराम ज्युनिअर कॉलेज, कडा; ॲग्री विषयात घवघवीत यश

**आष्टी / प्रतिनिधी :**
श्रीराम ज्युनिअर कॉलेज, कडा येथील इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांनी ॲग्री विषयात उल्लेखनीय यश संपादन केले आहे. परीक्षेला बसलेल्या ७० विद्यार्थ्यांपैकी तब्बल १५ विद्यार्थ्यांनी १०० पैकी १०० गुण मिळवले, तर ८





विद्यार्थ्यांनी ९९ गुण प्राप्त केले.

विद्यार्थ्यांच्या या यशामागे ॲग्री विषयाचे प्राध्यापक दत्तात्रय ढवळे यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच प्राचार्य दादासाहेब काळे व उपप्राचार्य संजय धोंडे यांनी विद्यार्थ्यांना सातत्याने प्रोत्साहन दिले.

या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा माजी आमदार भीमराव धोंडे, अजय धोंडे, अभयाराजे धोंडे, प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. महाविद्यालयाच्या या यशामुळे परिसरात सर्वत्र कौतुक होत आहे.

## भिल्ल पलटण गल्ली येथे गंगापूजन व कीर्तन सोहळा उत्साहात

**कन्नड / प्रतिनिधी :**
चारीधाम यात्रा पूर्ण करून परतलेल्या भाविकांच्या स्वागतासाठी भिल्ल पलटण गल्ली येथे गंगापूजन, मावंद्याचे कार्यक्रम व भव्य कीर्तन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रम भक्तिमय वातावरणात पार पडला.
यावेळी गोरखनाथ पुंजाबा पाटील आल्हाड, निर्मलाबाई पाटील आल्हाड, केशवराव रामराव पाटील राजापुरे, रुक्माई पाटील राजापुरे, सरस्वतीबाई पाटील राजापुरे, जिजाबाई पाटील आल्हाड व वच्छलाबाई पाटील आल्हाड या चारीधाम यात्रेवरून परतलेल्या भाविकांचा सन्मान करण्यात आला.
कीर्तन कार्यक्रमात भागवताचार्य ह.भ.प. रामेश्वर महाराज यांनी कीर्तन सादर केले. त्यांच्या निरूपणाने उपस्थित भाविक मंत्रमुग्ध झाले.



या कार्यक्रमाला भाजपा नेते व उद्योजक मनोज केशवराव पवार यांनी उपस्थित राहून भाविकांचे स्वागत केले व त्यांच्याकडून आशीर्वाद घेतले. त्यांनी आपल्या मनोगतात चारीधाम यात्रेचे महत्त्व सांगितले.
कार्यक्रमास परिसरातील नागरिक व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

**मदतीचा ओघ सुरू** ➤ सुशोभीकरण, सुविधा निर्माण करणे, धार्मिक वारसा जतन करण्यासाठी विकासकामे सुरू

## श्रीक्षेत्र मच्छिंद्रगड येथे सुरू असलेल्या मंदिर जीर्णोद्धाराच्या कामासाठी आ.सुहास कांदे, आ. नितीन पवार यांनी प्रत्येकी दहा लाखांची दिली देणगी

**आष्टी / प्रतिनिधी :**
नाथ संप्रदायाचे श्रद्धास्थान असलेल्या श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ गड येथे सध्या मंदिराच्या जीर्णोद्धाराचे व विकासाचे काम मोठ्या प्रमाणावर सुरू असून या पवित्र कार्यासाठी विविध स्तरातून मदतीचा ओघ सुरू आहे. याच पार्श्वभूमीवर आमदार सुहास कांदे व आमदार नितीन पवार यांनी मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी प्रत्येकी दहा लाख रुपयांची देणगी देत मोठ्या भक्तीभावातून योगदान दिले आहे.
मच्छिंद्रनाथ गड हे नाथ संप्रदायातील



एक महत्त्वाचे धार्मिक स्थळ मानले जाते. दररोज येथे हजारो भाविक दर्शनासाठी येत असतात. गडावरील मंदिराचा जीर्णोद्धार, परिसर सुशोभीकरण, भाविकांसाठी सुविधा निर्माण करणे तसेच धार्मिक वारसा जतन करण्याच्या उद्देशाने विविध विकासकामे सुरू करण्यात आली आहेत. या कामासाठी लोकप्रतिनिधी, भाविक व दानशूर व्यक्तींकडून सहकार्य मिळत आहे.
आ. सुहास कांदे यांनी मंदिराच्या विकासासाठी दहा लाख रुपयांची देणगी देत "मच्छिंद्रनाथ गड हे अध्यात्म, श्रद्धा आणि संस्कृतीचे केंद्र असून या पवित्र स्थळाच्या विकासासाठी योगदान देण्याची संधी मिळणे ही भाग्याची बाब आहे," असे सांगितले.
तर आ. नितीन पवार यांनीही गडाच्या धार्मिक व ऐतिहासिक महत्त्वाचा उल्लेख करत मंदिर विकासासाठी आपले सहकार्य कायम राहील, अशी भावना व्यक्त केली. त्यांनी दिलेली दहा लाख रुपयांची देणगी मंदिर जीर्णोद्धाराच्या कामाला मोठी मदत ठरणार असल्याचे सांगितले जात आहे.
सध्या गडावर मंदिर दुरुस्ती, सभामंडप उभारणी, परिसर विकास, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, भाविकांसाठी निवारा व अन्य सुविधा उभारण्याचे काम सुरू आहे. स्थानिक ग्रामस्थ, भक्तगण आणि विविध संस्थांकडूनही उत्स्फूर्त सहभाग नोंदविला जात आहे. या देणगीबद्दल मंदिर देवस्थान ट्रस्ट व ग्रामस्थांच्या वतीने आ. सुहास कांदे आणि आ. नितीन पवार यांचे आभार व्यक्त करण्यात आले. त्यांच्या या योगदानामुळे मच्छिंद्रनाथ गडाच्या विकासकामांना अधिक गती मिळणार असून भाविकांसाठी अधिक सुविधा उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.

ई पेपर वाचा
सांज दैनिक बीड · वास्तव
http://epaper.beedvastav.com
https://www.beedvastav.com